म. ग्रं. सं. ठाणें
[वि]षय काव्य
क्र. २५५८

# ॥प्रारंभ॥

अरुणा ढेरे

REFBK-0025337
REFBK-0025337

संदर्भ काव्य
२५५८
२५३३८
१।७।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५५८
मूल्य २५३३८
१।७।८८
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

# ॥ प्रारंभ ॥

अरुणा ढेरे

REFBK-0025337

REFBK-0025337

उत्कर्ष प्रकाशन, पुणे

प्रकाशक
सौ. सविता सु. जोशी
उत्कर्ष प्रकाशन
रेणुका अपार्टमेंट्स्
पुणे ४११००४
'ओंकारदर्शन', २७३ शनिवार पेठ
पुणे ४११०३०

© अरुणा ढेरे
'विदिशा', १० अभिराम सोसायटी
तुळशीबागवाले कॉलनी
पुणे ४११००९

मुखपृष्ठ
रविमुकुल, पुणे

मुद्रक
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ
पुणे ४११०३०

प्रकाशन-तिथी
महाशिवरात्र
२६ फेब्रुवारी १९८७

मूल्य : वीस रुपये

ती० आबांना—

एके काळी तुम्ही भरभरून केलेलं कौतुक

आणि नंतर

नियतीनं अक्षरांत येऊ न दिलेली प्रस्तावना

एवढं या संग्रहाचं पाठबळ आहे.

# अनुक्रम


१ बंध / १७
२ सोहळा / १८
३ आले दुःख माझिया घरी / १९
४ मन वेडे खुळे / २०
५ आषाढाचे कृष्णमेघ / २१
६ खेळ / २२
७ कथा रुपेरी / २३
८ कधी / २४
९ रात आली परसात / २५
१० जिणे कनकाचे व्हावे / २७
११ नको नको म्हणताना / २९
१२ मृगाचे दिवस / ३०
१३ तुझ्या डोळ्यांतली गाणी / ३१
१४ स्मरण / ३२
१५ काल दुपारी / ३३
१६ प्राणांमधुनी पूल करावा / ३४
१७ वाटतं फक्त / ३५
१८ जपुन जरा / ३६
१९ ब्रह्म माहेराला आले / ३७
२० मौन भोवले तुला-मला / ३८
२१ उभे क्षितिज तोलता / ३९
२२ तिच्या मनाच्या कदंबातळी / ४०
२३ श्रावण येतो आहे / ४१
२४ सुखाचे भविष्य / ४२
२५ कधी स्वप्नात गाताना / ४३
२६ हा असाच श्रावण / ४४
२७ देवकेळ गर्भार / ४५
२८ मी रात्र / ४६
२९ कविता दिवाळीच्या / ४७
३० दूर राऊ धाडलेला / ४९
३१ पावसाच्या कथा / ५०

३२ मेघ / ५१
३३ बाधा / ५२
३४ पसा देता-पसा घेता / ५३
३५ अनुत्तरित प्रश्न / ५४
३६ प्रार्थनावेळा / ५५
३७ वळणावर लावुन दिवे / ५७
३८ कोरडा पाऊस / ५८
३९ झोका / ५९
४० स्वप्नातिल पूर असा / ६०
४१ एक होता लय लय / ६१
४२ नुसत्याचा पसारा / ६२
४३ कवितांचे चेतन प्रहर / ६३
४४ बुडताना कळते / ६४
४५ दूर....अगदी दूर कुठे तरी / ६५
४६ शिशिरातल्या या राघववेळेला / ६७
४७ तुझ्या-माझ्यातल्या नात्याला / ६९
४८ कवितेचे झुळझुळ पाणी / ७०
४९ आता तरी / ७१
५० एखाद्या आदिवासी संध्याकाळी / ७२
५१ तू-मी / ७३
५२ जगण्याला शब्द मिळे / ७४
५३ पल्याड अपुल्या / ७५
५४ ओंजळीत तुझे हसू / ७६
५५ मर्मबंध / ७७
५६ कोण्या पुण्यवंत मनी / ७८
५७ निंब / ८०
५८ चांदण्याच्या कविता / ८१
५९ तिच्या कविता : भांडणानंतरची स्वगते / ८५
६० अंतातुन प्रारंभ नवा / ८७
६१ माझीच मला ही कविता / ८८

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५८
दा. क्र.
काव्य २५३३८
१०८८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## ॥ प्रारंभ ॥

त्या ढळत्या रात्री जेव्हा
मज नव्हते कसले भान,
हलकेच विलगले ओठ
हलकेच उमटली तान

त्या सुरात अंधाराने
नखलली कोवळी पाने
मनविडा जुळविला तेव्हा
मी प्रथम गाइले गाणे

ते गाणे कसले ? – होता
नुसताच निळासा रंग,
आयुष्य समजण्याचाही
तो निळा निळा प्रारंभ

□

# कविता आणि मी

□

कवितेच्या आणि आपल्या संबंधात काही लिहायचं म्हणजे तरी काय लिहायचं?

हे नातं तसं विश्लिष्ट करण्याजोगं नाहीच. तसं ते कोणाही कवीचं नसतं. आपला एकांत आपण कधी तरी या नात्याला आंदण देऊन टाकलेला असतो.

हा आंदणकाळ कधी आला? त्याआधी काय होतं? त्याआधी फक्त शब्दांशी खेळणं होतं. जे गद्यात म्हणायचं, ते एखाद्या सुंदर कल्पनेनं सजवून, शब्दांची गद्यापेक्षा निराळी गुंफण करून आपण म्हणू शकतो, एवढंच वाटत होतं. तेव्हा कविता नव्हती, गीतही नव्हतं. तेव्हा फक्त पद्य होतं—शालेय वयातलं कवितेबद्दलचं आकर्षण होतं.

पण त्याच काळात मी चांगल्या कविता वाचत होते. गीतं ऐकत होते त्यांतलं झपाटून टाकणारं काय आहे, हे स्वानुभवातून समजायचं होतं; पण तो झपाटलेपणा स्वतःच्या शब्दांतून उतरावा, अशी तडफड होती. या तडफडीतूनच कधी तरी मी स्वतःत उतरले असणार, आपलाच आवाज ऐकला असणार आणि त्या आवाजाला उद्‌गार देणारे शब्द मला सहज सामोरे आले असणार. तिथून तो आंदणकाळ सुरू झाला. कवितेची एक सुजाण जवळीक वाढत राहिली.

भाषेचा अटळ स्वीकार कोणीही करील. करतोच. संवादासाठी, विनिमयासाठी ते एक अपरिहार्य माध्यम असतं. व्यवहाराच्या पातळींवर भाषा जीवनावश्यक घटक म्हणून वावरते. पण व्यवहारापलीकडच्या जगण्यासाठी भाषेचा स्वीकार करणं हिमतीचं आहे, साहसाचं आहे, असं मला वाटतं. इथं भाषेच्या पुसून गेलेल्या वाक-वळणांचा शोध घ्यावा लागतो. व्यवहारात घासल्या गेलेल्या कोपऱ्या-कंगोऱ्यांना पुन्हा धार करावी लागते. हात त्या धारेने कापून घ्यावे लागतात. आणि कधी कधी तर भाषेतल्या फसव्या वाटांवर आणि निसरड्या

उतारांवर स्वतःला जिद्दीनं झोकून द्यावं लागतं. तिच्या आत्म्याला तुम्ही सामोरे जात असता. तिची शक्तधुंद नजर पेलायचं सामर्थ्य कमवावं लागतं.

शब्दांचा आनंद स्वीकारणं सोपं नाही. तो तुमचा अहंकार मिटवतो. कृत्रिमता पुसतो. व्यवहारावर मात करतो.

शब्दांचं दुःख स्वीकारणंही सोपं नाही. शब्द छळतात. मुश्किल करतात. त्यात मृत्यू असतो आणि पुनर्जन्मही.

शब्दांचा स्वतःचा तोरा, स्वतःची चाल, त्यांची प्रभुत्व गाजवण्याची वृत्ती आणि आपले आवाज, यांचा देखणा मेळ घालण्यासाठी किती परींनी स्वतःला शुद्ध करून घ्यावं लागतं.

हे सोपं नाही. म्हणून तर लोक शब्दाला घाबरतात. बांधून ठेवतात. शब्द त्यांच्यावर संकट आणतात. पण शब्द आनंदही आणतात. शब्दांना आपण बांधतो, तेव्हा त्याबरोबर येणारा आनंदही बांधतो, नाकारतो; शब्दांच्या जिवंतपणाला घाबरतो.

मी हे घाबरणं ज्या क्षणी विसरले, तो माझ्या आयुष्यातला सर्वात विलक्षण क्षण असेल. या शब्दांचा स्वीकार कर, पुन्हा ते मिळतील-न-मिळतील, असं म्हणून त्या समुद्रात मी स्वतःला झोकून दिलं.

आता मागे वळून या क्षणाचा विचार करावा, इतकी मी अजून पुढे कुठे आले आहे ?

या अवस्थेतलं विचाराल, तर कवितेइतकं समृद्ध आणि अपुरं संवादसाधन दुसरं कोणतं वाटत नाही. शब्दांच्या सामर्थ्याशी आणि मर्यादांशी एक असह्य संघर्ष नेहमी चालू असतो. ढोबळ म्हणण्यासाठी जेव्हा ओठ उघडतात, तेव्हा ते म्हणणं सोपं असतं, सोपं जातं; पण स्थूलपणा फोडून जेव्हा आपण अनुभवाच्या गाभ्याला स्पर्श करू पहातो, तेव्हा मग त्या अनुभव-हृदयातून उठलेलं म्हणणं शब्दांत नीट बसत नाही. भाषा अडलीशी वाटते. मग तिच्या आडवाटा शोधल्या जातात. कधी 'तरुण वारे', 'कुंवार कविता', 'प्रसवशील उजेड' अशी विशेषण-विशेष्यांची वेगळी जोड केली जाते. कधी शब्दांतून एखादं दृश्य उभं करताना अर्थाची आकृती घट्ट बसवली जाते आणि 'ओळखीच्या पैलपार पसरलेली संचिताची मुळे' अशी अभिव्यक्ती येते. कधी नव्या प्रतिमा अटळपणे जन्मतात, जाणीव-नेणिवेच्या पातळीवरची असंगत विधानं येतात, तर कधी चकवणारा सरळपणाही ! मात्र हा चकवा, ह्या आडवाटा, ही विसंगती म्हणजेच कविता, असं नाही.

मला संतांचं यासाठीच नवल वाटत आलं आहे. किती सहज, विनासायास त्यांचे शब्द अर्थापाठीं टपटपतात! 'व्याली वेदना जाणे । वांझ काही नेणे!' अशी स्पष्ट अभिव्यक्ती असो किंवा 'घडेगाडगियांचे कोंब । हे तों कुलालमतीचे गर्भ ।' अशी अंतःस्पर्शी जाणीव असो, शब्दांचे कोणतेही सायास इथे जाणवत नाहीत. 'दुरून एक ऋग मागावया आले । मी माझे पाहिले तंव कांहीं नाहीं ।' ही निवेदनाची सरळ साधी पद्धत भाषेच्या सगळया नेहमीच्या संकेतांचा उपयोग करूनही किती गोडव्याची वाटते!

सगळयाच लोकाविष्कारांमधली जिवंतता, उत्स्फूर्तता शब्दार्थांच्या झगड्यावर कशी मात करते, याचंही मला फार आकर्षण वाटतं. शब्दांनी अनुभवाच्या गळयात इतक्या सहजपणे हात गुंफले तरी कसे? अनुभवानं जे गमवायला सांगितलं, ते त्यांनी गमावलं कसं? अनुभवाच्या साथीनं जे गमावलं ते कमावलं, हे रहस्य शब्दांना कळलं कसं? 'तुला स्मरूनिया । शब्दापाशी येते । आणि संपविते । सारे काही ॥' असं मर्मस्पर्शी संवेदन मी जेव्हा सरळ साधं व्यक्त करून जाते, तेव्हा मला कुठला अनाकलनीय आनंद होतो!

या प्रश्नांच्या उत्तरांतून कवितेसंबंधी थोडं काही समजू शकेल का, असं मी स्वतःलाच विचारते आणि काही वेळानं कार्लाइलच्या स्टाईलनं स्वतःच स्वतःला उत्तर देते की, 'जोवर मला कोणी विचारीत नाही, तोवर मला माहीत आहे कविता म्हणजे काय ते. पण जर कुणी ते विचारील, तर मात्र मला ते माहीत नाही.'

माझ्या लेखी कविता हे स्वतःला व्यक्तवण्याचं माध्यम आहे. कवीजवळ कोणत्याही व्यक्तीकरणासाठी स्वतःचं व्यक्तित्व नसतं, तर एक विशिष्ट माध्यम असतं–भाषेचं! अर्थात् कवितेतून जेव्हा मला माझी मी प्रकट होते, तेव्हा 'मी' माझ्यापुरती मर्यादित राहिलेली नसते. इतर अनेक दृश्यांचे, वस्तूंचे, व्यक्तींचे अनुभव ते ते दृश्य, वस्तू व्यक्ती होऊन या 'मी'नं घेतलेले असतात. ते मग परके रहात नाहीत; 'मी'चेच होऊन जातात. कथा–कविता–कादंबरीतून लेखक–कवीच्या वैयक्तिकाचा शोध घेऊ पाहणाऱ्यांना चकवणारी–फसवणारी ही प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत आदिम भावना-वासनांचा गाभा समान असण्याच्या बळावर त्या गाभ्याभोवती जमणारे इतर व्यक्तिविशिष्ट घटकही आपलेसे करून घेतले जातात, आपले म्हणून भोगले जातात आणि त्यांना आपले म्हणूनच उद्‌गार दिला जातो. 'विश्वाचें आर्त माझ्या मनीं प्रकाशलें' असं म्हणणाऱ्या ज्ञानदेवांचा अभिप्राय हा आपापल्या मर्यादेत प्रत्येक कवीचा अभिप्राय असतो, असं मला वाटतं. विश्वाचं आर्त सर्वार्थानं माझंसं होतं आणि हे माझं म्हणून कवितेतून व्यक्त होतं.

मात्र हे व्यक्तवणाऱ्या भाषेवर तुमचा विश्वास आणि प्रेम हवं. डब्ल्यू. एन्. ऑडेनचे फार सुंदर उद्‌गार आहेत. तो म्हणतो, "मी प्रश्न करतो, 'तू कविता का लिहितोस ?' याचं उत्तर जर एखाद्या मुलानं दिलं की, 'माझ्याजवळ खूप महत्त्वाच्या गोष्टी सांगण्यासारख्या आहेत,' तर तो कवी नाही. पण त्यानं जर असं म्हटलं की, 'शब्द काय म्हणतात ते ऐकत त्यांच्याभोवती घुटमळणं मला आवडतं,' तर तो कवी होत असण्याची शक्यता आहे."

अर्थात् शब्द जे म्हणतात, त्यातून आपल्या अनुभवाचा आवाज नेमका कोणता, याचा शोध कवी घेत असतो अन् त्याचबरोबर भाषेच्या नव्या संभव-शक्यतांचा शोध त्याला लागत जातो. यातून जो कवितेचा घाट तयार होतो, तो मूर्त-अमूर्त, सामान्य-विशिष्ट, बोलीची अनौपचारिकता–तालाचा उपचार अशा किती तरी ताणांनी भरलेला रूपबंध असतो.

हे ताण जसे घाटात सामावलेले, तसा त्यांतून व्यक्त होणारा अनुभवही अंतर्द्वंद्वांनी भरलेला. किंबहुना त्या द्वंद्वांनीच अभिव्यक्तीच्या कळा लावलेल्या, जखमा केलेल्या. अनुभवातला सगळा संवाद आणि विसंवाद, सगळी व्यामिश्रता व्यक्त करणारा घाट सापडावा म्हणून केवढी तडफड होते ! मग कवितेची भाषा आपोआप सामान्य भाषेपेक्षा वेगळी होऊन जाते या भाषेतले ध्वनी, रेषा, टिंबं आणि रिकाम्या जागाही काव्यात्म अर्थानं भारल्या जातात. शब्दांची निवड खास आपली असते. जुन्या शब्दवळणांपासून नवे शब्द घडवण्यापर्यंत भाषेचं क्षेत्र सर्वत्र धुंडाळलं जातं. रचनेच्या परी बदलतात, नवनव्या शक्यता उपजवतात.

मात्र हे सगळं जाणीवपूर्वक होतं, असंच नाही. कित्येकदा अनुभव इतक्या सहज आपल्या उद्‌गाराचा बंध घेऊन येतो की, लिहून पूर्ण झाल्यावरच त्यातली यथार्थता उलगडू लागते. मधे थांबणं नाही, की अडखळणं नाही.

कधी असंही होतं की, दोन ओळी सुचतात आणि पुढं काही मांडताच येत नाही. सगळं अंधुक, अर्धवट...! ते अर्धवट रूप तसंच अर्ध अभिव्यक्त होऊन पडून राहतं. अशा अपुऱ्या जीवांकडे वळून पाहताना एक हुरहूर वाटते. त्यांना पूर्ण करण्याचा हट्ट मी सहसा करीत नाही. पण कधी तरी विचित्र मोह पडून मी मनानंच एखादा आकार पूर्णही करते. मात्र नेहमीच तो आकार मूळ आकारासारखा, त्याच्याजवळचा सुद्धा असत नाही. अशा वेळी ती बळेच प्रकटलेली अनुभूती छळते मागून कधीही वाचली, तरी ठसठसत राहते.

कविता कागदावर उतरवतानाचे क्षण तर फारच गमतीचे असतात. पूर्ण कविता मनात स्वच्छ आठवते आहे आणि मग ती सावकाशीनं उतरवून काढली आहे, असं माझं कधी होत नाही. ती सुचू लागते आणि एकदम अनावरपणे येते. त्या क्षणी मग सगळं इतर भान पुसलेलं असतं. ती लिहून संपली की

होणारा दुखरा आनंद फक्त मी नंतर आठवू शकते आणि आधीची, अनुभवाला पूर्ण समजून घेण्याची धडपडही. एकदा तो छळवाद संपला आणि शब्दांनी त्याचा ताबा घेतला, की मग उरते फक्त एक स्वतःला विसरण्याची अवस्था !

एखाद्या कवितेच्या जन्माबद्दल म्हणूनच नेमकेपणानं काही सांगता येत नाही. सांगितलं, तरी ते उगाच अवतीभोवतीचं. नंतर विचार करून उलगडून घेतलेलं.

किती कसे आवरावे मुके कढ आता
माझे ओथंबले मन
दाटलेल्या पान्ह्यामुळे जसा दुखे स्तन ।

रंग ओला प्राक्तनाचा कलंकाचे धन
झाले सांध्यमग्न जिणे
पक्ष्यांपरी भोवंडती माथ्याशी मरणे ।

आता नको आणखी तू हसूनिया जाऊ
असे कसे सहायचे ?
माझ्या विश्वासाचे पुन्हा उलटेच फासे ।

सीता भूमिमग्न, राम गवताला धरी
केस वैदेहीचे कुठे ?
निसटल्या आयुष्याची कशी धरू बोटे ? ।

ही माझी ( या संग्रहात समाविष्ट नसलेली ) एक कविता. अगदी रिकाम्या क्षणांमध्ये अनेकदा एक उदासी भरत जाते. ' विश्वाचं आर्त ' मनी भरावं, तसे कुठल्या कुठल्या दुःखांचे पडसाद त्यात उमटून राहतात. तुटलेली नाती, हरवलेली माणसं, निसटलेल्या संधी, हुकलेले डाव, हरलेले खेळ या सगळ्यांची एक सावळी छाया त्या क्षणांवर दाटून येते. हा असला मूड एका संध्याकाळी जुळून गेला.

पावसापूर्वीचं दाटलेलं वातावरण, त्यात भरून राहिलेला उदास, जड काळेपणा आणि जगण्यातलं सुंदरपण गमावल्याच्या जाणिवेनं दुखावलेलं मन ह्यांचं एक नातं तयार झालं. त्या नात्याच्या आधारानं मनसोक्त रडावं, अकारण रडावं, असं वाटू लागलं. धीरानं दाबलेले कितीक हुंदके वर येऊ लागले आणि ओळी आल्या—

किती कसे आवरावे मुके कढ आता
माझे ओथंबले मन

हे ओथंबणं कसं ? जन्मल्याबरोबर गेलेल्या बाळासाठी पान्हा दाटून स्तन दुखावा, तसं कळ लावणारं. जवळच्यांच्या जीवनातली जुन्या आठवणीतली ही घटना आपोआप ओळीत उतरली. आणि त्या दुखरेपणानं माझ्या मनोवस्थेशी अचूक नातं जोडलं—

‘ दाटलेल्या पान्ह्यामुळे जसा दुखे स्तन ! ’

मग अलगद संध्याकाळशी जुळलेल्या भावस्थितीला उद्गार मिळाला. ओलसर, करुण संध्याकाळचे सावळेपण आणि माथ्यावरून संथ सरकणारे बगळे....

रंग ओला प्राक्तनाचा कलंकाचे धन
झाले सांध्यमग्न जिणे
पक्ष्यांपरी भोवंडती माथ्याशी मरणे !

मनातली एकमेव अंधूक आशा आता हलली. पण तीही निसटणार नाही ना ? नव्या भीतीची छाया कारुण्यात मिसळली.

आता नको आणखी तू हसूनिया जाऊ
असे कसे सहायचे ?
माझ्या विश्वासाचे पुन्हा उलटेच फासे !

आणि मग ते दृश्य अलगद माझ्यापासून मी वेगळं केलं. एक अचूक पौराणिक संदर्भ तिथे चपखल बसवण्याइतकी अलिप्तता आली आणि माझी व्याकुळता पुन्हा शेवटच्या उमाळ्यातून त्या सगळ्या अनुभवाला वेटाळून गेली.

सीता भूमिमग्न, राम गवताला धरी
केस वैदेहीचे कुठे ?
निसटल्या आयुष्याची कशी धरू बोटे ?

कविता पुरी झाली. तिची रचनाही वेगळी. तीन ओळींचं कडवं. पहिली-तिसरी ओळ लांब. मधली लहान. ही रचना सुचायलाही कारण झाले, ते त्या दिवशी माथ्यावरून जाणारे बगळे. ती त्यांची घरी परतण्याची वेळ. माळा करून ते उडत जात होते आणि माळा अशा की, पहिली मोठी चारपाच पक्ष्यांची, मग लहान दोन-तीन पक्ष्यांची आणि मग पुन्हा मोठी. ही रचना आपोआप ओळींनी उचलली आणि कविता उतरून आली. त्या क्षणी ती किती झरझर उमटत गेली ! बाकी विचार आत्ताचे.

कविता म्हणजे छंद नाही. मात्रांचं आयोजनही नाही. ती शब्दांत झळकते, पण शब्दांत नसते. शुद्ध तेव्हाच असते ती, जेव्हा अनुभवाच्या मूलकाराला जराही न दुखवता ती उगवून येते. कवीची कमतरता तो लपवत नाही, तर सारं स्वच्छ उघडं करते. ती निमंत्रण होते, हाक होते, प्रार्थना होते, प्रेम होते.

शब्द वाचत असताना हे सगळं रसिकाला जाणवतं, लिहिताना कवीला जाणवतं. आणि हे जाणवणंच खरं. चिनी भाषेतली एक जुनी म्हण आहे की, ' जेव्हा कोणी संगीतज्ञ खरा संगीतज्ञ होतो, तेव्हा तो आपली वीणा तोडून-फोडून टाकतो. ' खरंच, जेव्हा संगीत आतून जागतं, तेव्हा वीणेचं काय करायचं ?

अशी अवस्था आस्वादाच्या पातळीवर येते, तेव्हा खरं काव्य तिथं असतं. म्हणून मला स्वतःला तरी कवितेचा आस्वाद घेताना कोणतीही चिकित्सा नको वाटते. एखादा महायोगी जसा निखाऱ्यावरून चालत जाऊन आपलं ' व्हिजन ' सिद्ध करतो, तसा कवी अनुभवाच्या आगीला सामोरं जाऊन आपल्या अंतर्मनातलं विश्व रूपसिद्ध करीत असतो. अशी सच्ची कविता ऐकताना जी सहजस्फूर्त दाद दिली जाते, ती खरी. एरवी समीक्षेचा काथ्याकूट आपण नाही, तरी आणखी कोणी करीतच असतो. पण वाऱ्यानं फूल हलावं, तितक्या सहजतेनं ओठांवर ' वा वा ! ' येतं, तेव्हा मग ती पूर्ण कविता, कवितेची एखादी ओळ, एखादा शब्दसुद्धा देवाचा शब्द असतो, असं मला वाटतं. सगळी स्वत्वाची जाणीव तिथं कवी आणि रसिक या उभयपक्षीं मावळलेली असते आणि उरतो फक्त अर्थवलयांकित शब्द—ज्याच्यासाठी तुम्ही-आम्ही सारेच काळीज अंथरायला तयार असतो.

— अरुणा ढेरे

---

**दुरुस्ती** / पृ. ३६ वरील चौथ्या ओळीतील ' लालसा ' हा पहिला शब्द ' लालस ' असा वाचावा आणि पृ. ४१ वरील शेवटच्या ओळीतील पहिला शब्द ' भवितव्यातिल ' असा दुरुस्त करून घ्यावा.

## बंध

पंख इवलेसे होते
तेव्हा आस होती एक
निळ्या गहन आभाळी
घ्यावी आसासून झेप.

पंख इवलेसे होते
तेव्हा नीड नको वाटे
श्वास श्वास सांगायाचा
निळ्या आभाळाशी नाते.

ओढ लागुनी अनाम
तेव्हा जीव वेडाखुळा
बळ पंखांमध्ये नसे
उंच भरारी घेण्याला.

थरथरणारे क्षण
लाख लाख आले गेले
इवल्याशा पंखांमध्ये
आता मत्त वीज खेळे.

वीज खेळे पंखांतून
गगनही खुणावते
परी घरट्याची माया
बंध रेशमी गुंफते.

आता घरट्याचे पाश
असे गुंतले प्राणांशी
कसे तोडू ? कसे जोडू
नाते निळ्या आभाळाशी ?

१९७३

## सोहळा

सहा ऋतूंचा सोहळा
आज माझ्या अंगणात
पौर्णिमेचा चंद्र झुले
अवसेच्या गगनात.

काय सांगू बाई आज
सदाफुली सुगंधित
कसे अघटित सारे
विष न्हाले अमृतात.

जे जे कुरूप तयाला
दिली सौंदर्याने खेव
पाषाणात बहरले
आज चैतन्यमार्दव.

आज दाराशी कुणाचे
सांग वाजते पाऊल ?
रुणझुणत्या लयीत
सांग कुणाची चाहूल ?

ओळखीच्या पावलांचा
मला नाद येई बाई
शब्द होऊनिया जागा
साद जीवनाला देई.

१९७३

## आले दुःख माझिया घरी

लक्ष व्यथांचे दीप पेटवित ओल्या अंधारी
आले दुःख माझिया घरी.

काल इथे दरवळले अभिनव
हर्षित, जरतारी स्वरवैभव
विरघळती मौनात आज त्या सुखमय स्वरलहरी
आले दुःख माझिया घरी.

आनंदाच्या फेनफुलांचे
हास्य लोपले लाटांवरचे
कृष्ण आर्तता भिजून सजली लोचनकासारी
आले दुःख माझिया घरी.

लक्ष वेदनांच्या ज्योतींनी
उजळित अंबर आणिक अवनी
लय विश्वाची झुळवित हसले कोणी हृन्मंदिरी
आले दुःख माझिया घरी.

१९७४

## मन वेडे खुळे

तुझी भेट होता शब्द
मुकेपण पांघरती
आणि तुझ्या दुराव्यात
पुन्हा ओठांवर येती.

तुझी-माझी भेट होता
वेडी पापणी झुकते
दूर दूर तू राहता
वाट तुझीच पाहते.

तुझ्यापाशी आल्यावर
क्षण युगासम होतो
तुझ्या चिंतनी कळेना
कधी येतो, कधी जातो.

तुझ्या जवळी कळेना
कशी होते मी कठोर
आणि तुझ्या स्मरणात
किती पुन्हा हळुवार !

भेट संपावी संपावी
असे उगीच म्हणते
आणि भेटीसाठी पुन्हा
किती किती व्याकुळते !

असे तळ्यात-मळ्यात
गाणे सदाचेच जुळे
सांग, मन माझे असे
कसे होते वेडे खुळे ?

१९७४

## आषाढाचे कृष्ण मेघ

आषाढाचे कृष्णमेघ
सखी, सजूनिया आले.

शुष्क मातीच्या मनात
आता सृजनाची गाणी
आणि निष्पर्ण झाडांच्या
ओठी हिरवी कहाणी
आज विरागी पर्वत
रोमरोमीं थरारले.

रित्या नदीच्या पात्रात
जीवनाचे संजीवन
कृपा ईश्वराची, तसे
काळे उतट गगन
जळी न्हालेल्या मातीच्या
सुगंधात जग न्हाले.

प्रेमकोवळा संदेश
कालिदासाच्या यक्षाचा
उरी जपत मेघ हा
म्हणे सृजनाच्या ऋचा
इन्द्रधनुष्याचे काव्य
क्षितिजाशी उमलले.

पापण्यांचे काठ आज
ओलावले ग कशाने ?
अंतर्मनातले काय
जागे मातीच्या वासाने ?
अमृताचे गाणे माझ्या
प्राणांतून मोहरले.

१९७४

## खे ळ

जन्मा आले तेव्हापासुन
एक आगळा डाव मांडला
जीवनभर अन् अटीतटीने
शब्दांशी मी खेळ खेळला.

जगावेगळा खेळ खुळा हा
असा रंगला, असा रंगला,
खेळामधला रंगच आता
आयुष्याचा अर्थ जाहला.

१९७५

## कथा रुपेरी

स्वप्नभारली, धुंद नशीली रात चांदणी आली ग
मदिर मदिर स्वप्नांची पखरण पानोपानी झाली ग

खुळ्या जुईची खुळी सावली जळात थोडी भिजली ग
प्रतिबिंबाला निरखत वेडी जुई मनी बावरली ग

विभ्रम अधिरे टिपताना ते चंद्र उरी थरथरला ग
देह जुईचा टिपूर ओल्या चांदण्यात मोहरला ग

फांदीफांदीतून तरळली लकेर स्पर्शसुखाची ग
कळी कळी पानांतुन फुलली, किमया चंद्रकरांची ग

चंद्रमिठीतुन दरवळलेली रात हळुहळू विरली ग
डोळे मोडुन खुळ्या जुईला रानपाखरे हसली ग

दरवळणारी कथा रुपेरी कुणा कशी सांगावी ग ?
अंगोपांगी फुले डवरली, कुठे कशी लपवावी ग ?

१९७५

## कधी

विरक्त शिशिरालाही पडते
स्वप्न सुगंधी शृंगाराचे,
वसंतस्नेही रति-मदनाच्या
रंगित उन्मादक प्रणयाचे.

दाहक ग्रीष्महि गातो केव्हा
गाणी ओल्या आषाढाची
रिमझिमणाऱ्या धुंद लयीतुन
पहिल्या नवथर मृद्गंधाची.

कधि अवसेच्या मनात फुलते
नक्षत्रांची वेल कोवळी,
बरसत येते स्निग्ध चांदणे,
काळोखातहि होय दिवाळी.

ज्या क्षणि घडते असली किमया,
मी माझेपण हरवुन बसते,
शतरंगी शब्दांना उधळत
मनात कविता उमलुन येते.

१९७५

# रात आली परसात

उन्हे पार उतरली
दिस सांजावून आला
वेध लागले डोळ्यांना
जीव वेडावून गेला.

सांज चोरपावलांनी
उतरली रानीवनी
गाईगुरे घराकडे
येती बाई परतोनी

खुळ्या पाऊलवाटांना
ओढ लागली गोठ्याची
जड झाली ग आंचळे
गच्च दाटल्या पान्ह्यांची.

गळा धुंगूर वाजती,
सूर मनी नादावती
मंद मंद किणकिण
डोळे उगा ओलावती.

कुठे घुमतो तुक्याचा
भावभिजला अभंग
दूर मंदिरी चढतो
हरिकीर्तनाला रंग.

सारी उनाड पाखरे
परतली घरट्यात
स्वप्ने चंदेरी रंगली
साऊल्यांच्या डोळियांत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५८
काव्य २५३३५
१।७।८८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

रात आली परसात
उरी पणती जळती
नाही चाहूल अंगणी
डोळे झरती झरती.

१९७५

## जिणे कनकाचे व्हावे

नको नको ना रे असा
खेळ खेळूस निष्ठुर
गात्र गात्र शिणले रे
आता धपापतो ऊर.

खेळ निराळाच तुझा
शब्द हिरावले तूच
अर्थप्रसवा प्रज्ञेचे
वरदानही दिलेस.

राजवर्खी आशयाला
घट्ट उरी कवळून
किती धावले धावले
मीही शब्दांच्या मागून.

शब्द दिलेस ना फक्त
स्वप्ने दिलीस बिलोरी
वास्तवाच्या स्पर्शाने रे
तीही पिचलेली सारी.

हौस पुरली पुरली
खेळ जीवनाचा झाला
तरी शब्दांचा मुलूख
नाही दिठीला लाभला.

महाद्वारी मरणाच्या
वेडी आस आता मना
आज अखेरीला तरी
यावी फळाला साधना

लाड लाडांचे पुरावे
शब्द अर्थाला भेटावे
कौतुकाच्या कवितेत
जिणे कनकाचे व्हावे

१९७५

# न को न को म्ह ण ता ना

नको नको म्हणताना
भारद्वाज का बोलतो ?
दारी फांदीशी झुलत
काही शकून सांगतो.

नको नको म्हणताना
नभ पाण्याशी झुकते
निळ्या जांभळ्या रंगात
सांज मिटूनिया जाते.

नको नको म्हणताना
होते सारेच भलते
उजाडता कुजबूज
साऱ्या रानभर होते.

१९७५

## मृगाचे दिवस

असे मृगाचे दिवस
धुंद कोसळे पाऊस
गर्द पोपटी रानात सखे हरवून गेले.

वेळ जांभळी जांभळी
उन्हे चाफ्यात लपली
रंग माखून हसले डोळां सांजस्वप्न झेले.

झिरमिळती पालवी
वेली उसासली नवी
मैनेसवे राघू बाई काही भलतेच बोले.

१९७५

## तुझ्या डोळ्यांतली गाणी

तुझ्या खट्याळ डोळ्यांत
स्वप्ने श्रावणी श्रावणी
तुझ्या डोळ्यांत सांडती
रंगबनातली गाणी

तुझ्या डोळ्यांतली गाणी
अशी वेल्हाळ लाघवी
माझ्या शब्दांना मौनाची
खुळी कल्पना सुचावी.

तुझ्या डोळ्यांतली गाणी
कधी होतात वादळ
उभा देह लपेटून
उठे बेभानशी कळ.

तुझ्या डोळ्यांतली गाणी
कधी आभाळ होतात
उभ्या जन्माच्या मातीला
आणि कवेत घेतात.

१९७६

## स्मरण

मीट कवाडे ओठांची रे
नकोच शब्दांचीही चाहुल
तितुक्यानेही विचलित होइल
मौनाहुन जे अबोल, कोमल.

लसलसल्या कोंबाहुन नाजुक
तरी बहरले आगीतुन ते,
प्रीतीहुन जे हळवे, भावुक
वादळात ते झुंजत होते.

स्वप्नाहुन जे नितळ, मुलायम
ते दगडांच्या खाली पिचले
उरात जखमा नित्य वाहत्या
तरिही अविरत होते हसले.

नकोत आसू, नकोत सुमने
फक्त असावे स्मरण उरातुन
तुझ्याचसाठी मिटलेले रे
एक सुवासिक, शापित जीवन

१९७६

## काल दुपारी

काल दुपारी एक कलंदर कुणी मुशाफिर आला
नुसती त्याची चाहुल येता, तोल मनाचा गेला.

त्याच्या ओठी बडबडगाणी
अर्धी-मुर्धी लोभसवाणी
गाभुळलेल्या त्या गाण्यांनी उरात ठेका चुकला.

डोळां त्याच्या मधुर निमंत्रण
नवखे कुठलेसे संमोहन
त्या त्याच्या तसल्या श्वासांनी कंप उभ्याने सुटला.

कुण्या गावची ओळख घेउन
ओलांडुन वृंदावन-आंगण
खुशाल हा भरल्या संसारी तुफानापरी घुसला.

क्षणभर मी बेसावध मूर्च्छित
क्षणात झाले अवचित जागृत
नकळत हाती चुडा वाजता तोल पुन्हा सावरला.

१९७६

## प्राणांमधुनी पूल करावा

खुळ्या मनाच्या ऐलतिरावर
उभी अस्मिता सस्मित होउन
मधून वाहे स्वप्न झुळझुळा
पैलतिरावर तुझे अहंपण.

खुळ्या मनाच्या ऐलतटाला
पैलतटाची हाक सारखी
ओलांडुन ही स्वप्निल सरिता
होउ कशी मी मला पारखी ?

ऐलतटाचे पैलतटाशी
मीलन व्हावे कसे कळेना
दोघांनीही कशी उरातिल
उधळुन द्यावी अहंभावना ?

ऐक सांगते, दोन तटांचे
असे असे रे मीलन व्हावे :
प्राणांमधुनी पूल करावा
बंधनातही मुक्त असावे.

१९७६

## वाटतं फक्त

वाटतं फक्त
श्रावण ओल्या कातरवेळी
तुझ्या मनाच्या काठी व्हावी
माझ्या आठवणींची दिवेलागण.
एक रातोत्पलासारखे तांबूस पाऊल अलगद वाजावे,
आणि–रुणझुणावेत नाजुक प्रीतिपैंजण

१९७६

## जपुन जरा

डोईवर घागरीत डुचमळते पाणी
पाण्यातुन उजट जरा पुनवेची गाणी.

जपुन जरा पोरी, हा पाणवठा धीट
लालसा ह्या तळ्याला ओढतात काठ.

लख्ख लख्ख चांदण्यात मोहरते काया
डोळ्यांतुन थिरकत ये मंतरली छाया.

परतु नये उशिराने, वेढित ये रात
भारित ये भासातुन मोरपिशी गीत.

'हे असले' वाऱ्याला सांगु नये काही
अन् भलते आमंत्रण धाडु नये बाई.

१९७६

# ब्रह्म माहेराला आले

लौकिकाला ठोकरून
झालो भणंग भिकारी
अमृताला झुगारले
पेला ओठांशी विखारी

विष रिचविता उरी
एक वेदना उदेली
तिच्या स्पर्शाने सोनेरी
माझी संवेदना झाली

आभाळाला कवळिता
अशा फाटक्या देहाने
अवचित हाती आले
काही दाहक देखणे

जीवेभावे जपताना
लाखमोलाचे हे देणे
दु:ख मिरविले शिरी
ल्यालो दारिद्र्याचे लेणे

सारे सोसत जळता
प्राण सोनियाचे झाले
माझ्या चंद्रमौळी घरी
ब्रह्म माहेराला आले

१९७६

## मौन भोवले तुला-मला

मुक्तपणे कधि हसताना, कधि वाद उगाचच करताना
कधीतरी अन् रस्त्यावरती गाठ अचानक पडताना

नकळत झाल्या भिडल्या नजरा, अजून मजला स्मरते रे
क्षणैक तारे हसले मिश्किल डोळ्यांतुन लखलखते रे

कधीतरी ते लटके भांडण, हवेहवेसे रुसवे ते
उगाच वाटे, मला हवे जे तेच तुलाही आवडते.

मनात होते नवखे काही, तुझ्या नि माझ्या, होते ना ?
लपंडाव पण असा रंगला, सांगावेसे वाटेना.

कधि उसळावे मनातले ते अबोध नवखे थरथरते,
लपवावे पण तुझ्यापासुनी—तुला कळावे तरिही ते.

घेत बैसलो परस्परांच्या हृदयाचा अंदाज खुळा,
इथेच चुकलो, फसलो दोघे, मौन भोवले तुला-मला.

१९७६

## उभे क्षितिज तोलता

सरसरत्या ज्येष्ठाने
असे हाकारे घालावे
सळसळत्या मातीला
नवे धुमारे फुटावे.

असे आषाढाने यावे
जीवेभावे बरसावे
न्हाण आलेल्या मातीला
ओल्या मायेने माखावे.

गर्द फेसाळ सुखाने
असे असे खळाळावे
निळ्या तुडुंब मनात
बीज व्यथेचे रुजावे.

दूर शैशवाचा गाव
असा अल्लद वाटावा
उभे क्षितिज तोलता
प्राण हळदिवा व्हावा.

नसानसात भरावे
ऊन माळलेले रंग
मेंदीगोंदणात यावा
आर्त राधेचा श्रीरंग

१९७७

## तिच्या मनाच्या कदंबातळी

वंशवनातुन अवघडलेला सूर मोकळा झाला
अनोळखी देशातुन वारा गीत घेउनी आला.

गीतातुन त्या नक्षत्रांचे अल्लद फुलले झेले
आणि सईच्या स्वप्नामधले गोकुळ झिंगुन गेले.

दूरामधले दीप केशरी तिला पालवित गेले
पापणीतले यमुनेचे जळ उसळत, गात निघाले.

क्षितिजकडेचा घन श्यामलसा उरात बरसत आला.
तिच्या मनाच्या कदंबातळी मोरपिसारा फुलला.

तिला न कळले देहावरती श्वास कुणाचे कलले
अशी निरखता तिला, तिच्यातुन सूर पुन्हा अवघडले.

१९७७

## श्रावण येतो आहे

सोनउन्हाचे ध्वज उंचावत श्रावण येतो आहे
झुलवित हिरवी स्मिते तरूंवर श्रावण गातो आहे.

घनगर्जित नभ गर्द जांभळे
खाली हिरवी किमया उसळे
परीकथेतिल यक्षलोक जणु जळात न्हातो आहे.

भिजल्या मातीच्या गात्रातुन
सुगंध अद्भुत येई उमलुन
रक्तामधले गूढ उखाणे तो उलगडतो आहे.

शतजन्मींचे माझे संचित
धारांच्या घेऊन ओंजळित
भव्यतव्यातिल कुठलीशी तो कथा सांगतो आहे.

१९७७

## सुखाचे भविष्य

तुफानले दुःख भोती उफाळते
लाटांचा कल्लोळ, वारे सुसाटते

क्षणोक्षणी घाव संकटांचे जिथे
तरळसे काय जपायचे तिथे ?

असंख्य वेणा या सोसायच्या किती ?
क्षणोक्षणी ऊर पिचण्याची भीती

चिमण्या गाण्याला हृदयी धरून
सांभाळावे किती वेदनांपासून

दृष्ट हास्यालाही लागे आसवांची
एका होकाराला लक्ष नकारांची

सुखाचे भविष्य—क्षणात संपणे
त्याच क्षणासाठी जगणे-मरणे.

१९७७

# कधी स्वप्नात गाताना

कधी स्वप्नात गाताना अचानक सूर हरवावे
तशा अर्ध्याच गीताने अधूरे अर्थ मिरवावे.

अधूरे अर्थ भावावे कळ्यांच्या मुग्ध प्राणांना
मिटाव्या पाकळ्या अर्ध्या, पुन्हा उमलून येताना.

उखाणे देखणे काही, खुळ्या वाऱ्यास घालावे
भराला चांदणे येता तयाचे श्वास झेलावे.

गुलाबी ओंजळीलाही तसे पेलू नये ओझे
गळावे श्वास अर्धे अन् उरावे नेमके ताजे.

अधूऱ्या ओंजळीची त्या, प्रियाला शपथ घालावी
मुक्याने सात रात्रींची कहाणी त्यास सांगावी.

कहाणी ऐकुनी अर्धी, जिवाची गाठ उकलावी
प्रियाने मात्र, तृप्तीची खूण अर्धीच पटवावी.

खूण अर्धीच पटवावी, दिसावे स्वर्ग रात्रींना
उरी अर्धेच जागावे असे स्वप्नात गाताना.

१९७८

## मी रात्र

बेहोष मैफली संपवुनी नृत्याच्या,
राहुट्या दिमाखी गुंडाळुन रंगांच्या
काफिले ढगांचे दूर चालले कोठे
कुहरात नभाच्या, श्वास तमाचा दाटे.

अंधार कोसळे दाट, गच्च धारांनी
कौलांतुन गळते अविरत काजळपाणी
घरट्यातुन सरकन् लहरत कांपत वीज
पंखांतुन थरथर, आणि विस्कटे नीज.

अन् देहाची चिरगुटे कच्च ही ओली
मी थरथरते, गर्भातिल ऐकुन बोली
आधार कुणाचा ? स्मृति अवघ्याच फितुर
उतरून देहभर घट्ट फक्त अंधार.

मी रात्र, सोसते अशा अनावर वेणा
प्रसवते युगांच्या कोमलशा दुःखांना,
अन् हसते, त्यांच्या डोळां दिसते मजला
ती वाट, जिथुन काफिला ढगांचा गेला.

१९७८

## क वि ता दि वा ळी च्या

१ वेदनांच्या काळोखाला
दीठ लागली सुखाची
सांज वेल्हाळ शब्दांची
झुके सलोख्या दाराशी ।

कशी मुक्याने हृदया
कळे हृदयाची हाक
उभी डोळ्यांत दिवाळी
दिवा उरातुन एक ।

२ ओठांआड काहीबाही
असे सोसता सोसता
नकळत कधीतरी
आत अंकुरली व्यथा ।

भारावुन ओटीपोटी
उभे भविष्य तेजाळ !
सुख-प्रसवाचा सण
दिवेलागणीची वेळ ।

३ कसे क्षितिज झुकले
जिव्हाळ्याने अंगणात
दुःख कुंतीपरी माझ्या
बहरले ओंजळीत ।

अशा वेदनांच्या कळा
किती पाहू ? किती सोसू ?
माझ्या अश्राप डोळ्यांना
आले आसवांचे हसू ।

दिवे लागले नसांत
रक्त-प्रकाशाचा झरा
उभा देह झाला आज
चंद्रज्योतीचा फुलोरा ।

४ सुख दिल्या-घेतल्याची
मागे वेल्हाळती खूण
नाते शब्दांचे-स्पर्शांचे
आठवणींशी अजून

दुःख येते कधी, कशी
जुळे जाणिवांची लय
नाही उमग पुढचा
कशी नाही मागे सय ?

खूण सुखाची सलावी
असा व्यथागर्भ क्षण
आयुष्याच्या अंगणात
दुःखदिवाळीचा सण

१९७८

# दूर राऊ धाडलेला

दूर राऊ धाडलेला, वाट मी पाहू किती ?
लेकराला पाजताना आसवे रोधू किती ?

अंगणी अन् ओसरीला रंगल्या गोष्टी जुन्या
परतलेल्या गाउलीला भेटले तान्हे पुन्हा.

बहरला काळोखचाफा, लख्ख नक्षत्रे खुळी
दडविता आसू दडेना, सून मी ग धाकली.

जीव गेला उडुन बाई, काम होता होइना
थबकले दारात, का ग सजग सोपा होइना !

सजण नाही परतलेला, जीव ओला भागला
काळजाचा गाव माझा, काजळाने माखला.

१९७८

## पावसाच्या कथा

पावसाच्या कथा — रान कच्च ओले
फकिराचे मन हिरवळलेले ।

पावसाच्या कथा — चातकचोचीत
एकेका थेंबात जीवनाचे गीत ।

पावसाच्या कथा — फुलांना लागले
भारावल्या पोटी गंधाचे डोहाळे ।

पावसाच्या कथा — उत्सव अंगणी
तळ्यात, मळ्यात, मनात पर्वणी ।

पावसाच्या कथा — सरीवर सरी
पागोळी पागोळी चंद्रमौळी घरी ।

पावसाच्या कथा — ओली चिरगुटे
पापणीत खोल ओलेपण पेटे ।

१९७८

## मे घ

खिडकीतून पावसाळी आकाश पहात
तुझं स्वतःभोवती सारं काही ओवून घेण्याचं निमित्त
मला पुरेसं व्हायचं,
अन् माझ्या निराशेचे कवडसे लख्ख पडायचे
अस्मितेच्या बिलोरी आरशावर,
तुझे स्वयंगर्वी डोळे दिपेपर्यंत
तू मग ठरवायचास स्वतःला सोशिक, नि मला भांडखोर.

तसा—आकाशाच्या निळ्या वक्षावर उसळत येणाऱ्या
मस्तवाल मेघासारखा ओथंबलेला, बेफिकीर तरीही.
जाणवण्याइतका दाट आवेगी....कधीच तू आला नाहीस, तसा.
माझ्या अस्मितेच्या आरशावर आपलं निळं मन पसरत
मला आहे-नाहीशी करणारा.

तसं कधी घडलं असतंच,
तर आरसा हरवला किंवा फुटला असता
किंवा, आरसा आरसाही राहिला नसता.

मी अजूनही कधीतरी मेघाला तुझं नाव देते.
अन् मग जराशाने
डोळ्यांवरचे बोट निपटत म्हणते—
' मऊशार झूल घातली, तरी धारेचं सल्य
काळीज चिरणारंच असतं.
वेडे, असं का नाव बदलून माणूस बदलत असतं!'

१९७९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ...... प्रारंभ ५१
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## बा धा

या काळिजवेड्या रात्री
वाटेवर उतरुन येती
काळोखसाखळ्या माझ्या
पायांत बांधुनी देती.

दूरात कुणाचे मेणे
रेंगाळत माझ्यासाठी
अनिवार सुखाच्या त्यांच्या
त्या प्रवासभोळ्या गोष्टी....

ते कोण निरंजन तेथे
गे निसुगपणाने हसते
परि गाठ एक प्राणांची
का सुटताही ना सुटते.

पदरात बांधल्या कविता
ही आग कुणाला देऊ ?
व्रत प्राणांचे हे बाई
मी टाकुन कैसी जाऊ ?

पैलाड कोण हाकारी,
ऐलाड अडविती गीते
मी उभी एकटी येथे
....अवसेची बाधा होते.

१९७९

## पसा देता – पसा घेता

पसा देता – पसा घेता
सुख असे – असे फुले
तसा पसायदानाचा
तुला-मला अर्थ कळे ।

स्वप्न होता आयुष्याचे
पाप गंगेच्या पाण्यात
कुठे पुण्याचा हिशेब
सारे वेचले गाण्यात ।

आता रित्या ओंजळीचे
तुला-मला रे भूषण
प्राक्तनाच्या रेखणीला
नको देऊस दूषण ।

१९७९

## अनुत्तरित प्रश्न

कुठून येतात अशा काळीजवेड्या ओळखी
उतरून प्राक्तनाच्या अंगणात
अन् काळवंडलेले क्षणही कसे रुळतात
चांदीचे पैंजण होऊन त्या पावलांत ?

मलाच समजत नाही केव्हा,
नक्षत्रांची वेल बहरून येते डोळ्यांच्या बिंबातून
अन् उलगडतात सातां जन्मांची कोडी
श्वासातून.. रक्तातून... स्पर्शातून.

पाऊसही होतो मग वेदनांचे खळाळते हसू
अन् सुहृदाच्या वचनासारखे होते
अंतर्मनातही निवांत – आश्वासक तसू–तसू

अन् मोहरलेल्या मनात मी तरीही
जोजवत बसते तोच अनुत्तरित प्रश्न....
कुठून येतात अशा काळीजवेड्या ओळखी,
उतरून प्राक्तनाच्या अंगणात ?

१९७९

## प्रा र्थ ना वे ळा

या उदास तिन्हिसांजेचे
व्याकूळ वाहते पाणी
वाऱ्याच्या ओठांवरली
विजनात हरवली गाणी

वृक्षांच्या मौनामधला
घुसमटला नाद कधीचा
कंठातिल गौळण जाते
फोडून घडा तंद्रीचा

होऊन स्मृतींच्या वेणा
अस्वस्थ सुखाचे रावे
पंखांवर तोलुन येती
करुणेची हळवी गावे

संदर्भहीन आशांचे
पांढरे मेघ विरलेले
काळोखलेख क्षितिजांच्या
प्राक्तनी कुणी लिहिलेले

स्वप्नांच्या हलती घंटा
क्षणगाईंच्या कळपात
मी भरून घेते वक्षीं
मातीचा श्वास निवांत

रात्रीच्या पाऊलवाटा
जांभळी शांतता ओली
प्राणांची दिवली येथे
बोलते निरंजन बोली

गेलेल्या आयुष्याचा
दाटतो गंध गहिवरला
प्राचीन बुद्धगुंफेतिल
मी होत प्रार्थनावेळा

१९७९

## वळणावर लावुन दिवे

वळणावर लावुन दिवे, उन्हाचे थवे विखुरले दूर
सावल्या मला बिलगून, पावलांतून, सावळा पूर.

झाडांचा माथा हलवि, निमंत्रण कळवि, कुणाला वारा
या इथे रक्तहिरव्यात, मंद शिरव्यात ठिबकतो पारा.

स्वप्नात रतीच्या फुलति, तसे हे झुलति फुलांचे घोस
झुळकीला लखडुन गंध, शोधतो धुंद मन्मथी देश.

गीतांचे व्हावे मोर, तसे मनभोर छंद डोळ्यांचे
बागेत जसे रुजतात, फुलुन फळतात, हात माळ्याचे.

अलकेचे घेउन रूप, आज मज खोप आपुली भुलवी
सृजनाचा होउन श्वास, सखी मधुमास उत्सवा सजवी.

१९७९

## कोरडा पाऊस

अंधार नाही, प्रकाश नाही–अशा या शुभ्र ढगांच्या वेळा!
रिकाम्या माळावरून त्यांच्या सावल्यांचा तांडा सरकावा
तशा मनभर सरसरत जाणाऱ्या आठवणी....

लवल्या-न-लवल्या पानांवरून जाणवावे पडल्या वाऱ्याचे अस्तित्व
तसे संथ हलते श्वास...

भविष्यातून आकस्मिक येणारे अन् वर्तमानरेषेवरून सरकत
भूतकाळात ठिबकणारे क्षण—
जसे तारेवरचे न दिसणाऱ्या पावसाचे थेंब....

...............

कुठल्या मातीला आता अंकूर फुटणार आहेत
या कोरड्या पावसात?

१९७९

## झोका

इवलाच माझा प्राण
त्याचे इवलेच गाणे
पानांफुलांच्या दाटीत
जसे मंद झोके घेणे.

झोका सुद्धा रेशमी रे
जाईजुईच्या फांदीला
अंधारात–उजेडात
झोका हलला–झुलला.

आणि अचानक झाली
तुझ्या आभाळाशी भेट
झोका तुटून भरारा
गेला आभाळाला थेट.

झोका आभाळात गेला
कसे झाले ? काय झाले ?
काही कळलेही नाही
कुठे होते, कुठे आले.

माझ्या इवल्या प्राणाला
फक्त माहीत इतुके
वादळाने गाणे नेले
मागे उरले हुंदके.

१९७९

## स्वप्नातिल पूर असा

पाण्यातुन ऊन असे वळताना, रुळताना
छायांचे श्वास असे चळताना, ढळताना

गीतातून शब्द भिजे, शब्दातुन अर्थ रुजे
पाण्यातुन किरण झुले, डोळ्यांतुन स्वप्न तुझे

स्वप्नातिल गगन कसे मेघांनी उतटुन ये
सौख्यसरी झडझडता रोमावलि उमटुन ये

चिंब चिंब क्षितिजकाठ, तृप्त भुई होताना
मिथुनोत्सुक वेलींना वृक्ष उरी धरताना

देह उभा कवटाळुन एक हाक उठते रे
'तू हवास!' तू नाहिस-कळते, नच वळते रे

सावरते पदरकाठ, तरि भलते घडते रे
स्वप्नातिल पूर असा-गाव उभे बुडते रे

१९७९

## एक होता लय लय

असे राऊळाशी येता
पाऊलांसी रोखू नये
उमाळ्याच्या गर्भगृही
पाप-पुण्य राखू नये

असा आरतीचा शब्द
ओठांआड सुकू नये
ओवीतला अनंत गे
असा-तसा विकू नये

मन देताना सजीव,
मुके मुके होऊ नये
जिणे गाण्यासाठी देता
मागे-पुढे पाहू नये

रान हिरवे होताना
पिवळ्याला भेटू नये
आत-बाहेर न्हाताना
रुख्या क्षणीं मिटू नये

आभाळाच्या कवेमध्ये
वेगळीक जपू नये
एक होता लय लय
काही सांगताही नये

१९७९

## नुस्त्याचा पसारा

नुस्ते नुस्तेच बहाणे
काही अशाचे तशाचे
नुस्ते नुस्ते शब्द, जसे
मुक्या मेलेल्या गाण्याचे

नुस्ती नुस्ती झोप
नाही सल आठवाचा
नुस्ती नुस्ती जाग
डंख नाही अंधाराचा

नुस्ते हसणे, न त्याला
धार निळी उमेदीची
फिक्या रडण्याला ओल
नाही खोल उमाळ्याची

दूध ओठांतले नाही
सुक्या मायेत दाटणे
रक्त सळाळून नाही
त्वेष-द्वेषात वाहणे

मिळे मचूळ क्षणांना
नुस्त्या संस्कृतीची राख
मना पापपुण्य–नुस्ता
बुजगावण्याचा धाक

असा नुस्त्याचा पसारा
झाले जगणे मरणे
आता कशासाठी बापा
तुझे सृजनउखाणे ?

१९७९

## कवितांचे चेतन प्रहर

कृतार्थतेनं रक्ताच्या थेंबांना नवी लाली चढावी
असे आप्राण, विश्वलक्षी कवितांचे चेतन प्रहर
नेहमीच येत नाहीत

आकाशाच्या पांढऱ्या माळावर रंगीबेरंगी कोंब फुटावेत
अन् पहाता पहाता तुडुंब रंगशेत आक्षितिज लहरावं....
रखख उन्हाळा कोसळत असतानाच
हिमसेकानं गोठवलेल्या संजीवक जळराशीनं एकाएकी
रित्या नदीचं पात्र काठोकाठ ओसंडून उतू जावं....
तसा – कोऱ्या कागदावर वारंवार टेकणाऱ्या
लेखणीतून, क्वचित्, अगदी क्वचित्
टपटपतो शब्दांचा अभिषेक
युगांच्या स्पंदनांनी सजलेल्या शक्तिपूजेच्या
साऱ्या समर्थ अर्थाने ओथंबलेला.
त्वचेचं चंदन होऊन जावं अन् ओंजळींचे दुर्वांकूर,
अवघं अस्तित्व व्हावं एक शुभंकर प्रार्थना—
असे आप्राण, विश्वलक्षी कवितांचे चेतन प्रहर
नेहमीच येत नाहीत.

का तितकी, तशी
मीच स्वतःला पुन्हा देत नाही ?

१९८०

# बुडताना कळते

डोळ्यांत उतरते नीज
किरणांचा अर्थ बदलतो
काळोखसावल्यांभवती
स्वप्नांचा धूर तरळतो

कटिबंध जरासे सैल
शब्दांचे अर्थावरचे
व्यवहारी उतरे ओझे
शिणलेल्या संज्ञेवरचे

संदर्भ जगाचे पुसता
किति अलगद होती श्वास
डोहाच्या पाण्यावरती
जशि मंद फुलांची रास

पाण्यात पाउले बुडता
मन थरारते हलक्याने
ओढीचे फक्त बहाणे....
अपुलेच शोधणे गाणे

बुडताना कळते अपुल्या
आत्म्याला कंठ न ओठ
कुठुनी मग गाणे? कुठला
मौनाला हिरवा काठ?

१९८०

## दूर ... अगदी दूर कुठेतरी

दूर .... अगदी दूर कुठे तरी
पाऊस वाजू लागला.

सगळी मध्यमवर्गीय खिडक्या-दारे पटापट उघडली
आयुष्याची घरे जरा सावरून हुशारली.

अंगण नवलाने पहात राहिले—
वाकलेला जीर्ण कणा चिवट आशेने ताठ होताना
थिजलेल्या आजारी डोळ्यांतून केविलवाणे लकलक होताना
फाटक्या बाळपणाला निष्पाप कारुण्याच्या भिंगोऱ्या खेळताना
अन् विटक्या तारुण्याला, हौसेने नवी झड झेलण्याची
तयारी करताना

पाऊस दूर....अगदी दूर
नुसताच वाजून गेला.
सगळी खिडक्या-दारे कशी निमूट मिटून गेली
मस्तवाल उन्हाची काहील पुन्हा पत्र्यावर पसरली.
कुठे तरी घरात थोडी तगमग–पडझड झालीशी वाटली.

खरे तर या घरांच्या अंगणापुढे
मंतरलेली एक रेघ असते,
जिच्या आत पाऊल टाकताच
पावसाचेही ऊन होते.

आपण आपले म्हणायचे :
गेला पाऊस दूरच वाजला
पुढचा पावसाळा दारात येईल
ओल आलेल्या मनालाही
फारशी घालणे राहून जाईल.

आणि मग आम्ही एकेक संवेदना
कसोशीने बाजूला ठेवत जातो,
पुढच्या पावसांची तरतूद करतो—
दूर....अगदी दूर कुठे तरी
पाऊस वाजू लागतो.

१९८०

## शिशिरातल्या या राघववेळेला...

हळुहळू कसे उडून जातात पानांवरचे हिरवे रंग....
जरी दव धरत असले आकाशाचे बिंब,
तरी समृद्धीचे आश्वासन देण्याचे सामर्थ्य त्यातही नसते
आणि गवते पिवळी होत जातात.
जमिनीवर पांढुरक्या पानांची चुरमड विखुरते.
तरी कोरड्या शेतजमिनीच्या बांधावर
बाभळीचे पिवळे झुबे डुलत असतात.
जराजर्जर म्हाताऱ्याच्या चेहऱ्यावरील
पिकलेल्या हास्यासारखे संथ धुक्याचे पुंजके
सुरकुतलेल्या हवेतून झिरमिरत राहतात.

शिशिरातल्या या राघववेळेला....
नदीच्या काठाने चुकार भटकणाऱ्या
निळ्या पक्ष्यांची बडबड
प्रवाहाच्या गंभीर नादात खट्याळ भोवरे, उठवते
तरी घाटावरच्या मंदिरातली घंटा
लयीचा तोल सावरून धरतच असते.
तरुण हृदयाच्या स्वप्नासारखा
काजव्यांचा थवा मंद लुकलुकत जातो
आणि आयुष्य ओंजळीत आणून फेकल्यासारखे
कोळ्याने टाकलेले जाळे पाण्यावर चकाकू लागते.

शिशिरांतल्या या राघववेळेला....
ओचेपदर खोवून धुणे चुबकणाऱ्या घाटदार पोटऱ्या
आणि त्यांना स्पर्शणारे पोपटी शेवाळाचे गुच्छ....
पैलथडीला रेंगाळणाऱ्या तरुणाच्या अवतीभोवती
दगडावर घोटाळणारी अंधुक उन्हे
आणि त्याही पलिकडचे
झोपड्यांना खेटून वाढलेले थरथरते वृक्ष....


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५८
दा. क्र. २५३३०
काव्य २५४३०

अंतःकरणातल्या सगळ्या विनवण्यांची
शुभ्र गाणी व्हावीत तशी ही शिशिरातली राघववेळ
सत्यात स्वप्नाचे किती मधुर रसायन मिसळते !
अर्धबट जळालेल्या लाकडाच्या वळसेदार धुरावर सुद्धा
मन स्वतःला भिरकावू बघते.
पक्वता किती कातर, अपूर्णता किती निवांत
झालेली दिसते
शिशिरातल्या या राघववेळेला.

१९८०

## तुझ्या-माझ्यातल्या नात्याला

तुझ्या-माझ्यातल्या नात्याला अर्थ देण्याची प्रक्रिया
जोवर आपण सुरू केली नाही,
तोवर त्याचा निदर्शक शब्द कोणताही असला,
तरी हरकत काय आहे ?

मला माहीत आहे, समाजाला नाही पचत
नुसत्या नात्याचे असणे
अन् समूहमनाला नाहीच कळत
अंतरात खोलवर जागलेल्या जाणिवेचे
फुलणे....सलणे....जीवघेणे....

ही नात्याची ठिणगी अलग फुलवत ठेवताना
समाजदत्त अर्थाच्या आपल्यापर्यंतच्या झेपेचे भान ठेवण्याची
कसरत करणे अवघड आहे
आणि जर गाव पेटलेच, तर बोभाटा
आपल्या नावाने होणार आहे.

पण तरी देखील,
आपल्या आंतरप्रतीतिधर्मावर माझा विश्वास आहे.
मग तुझ्या-माझ्या नात्याचा निदर्शक शब्द
कोणताही असला, तरी हरकत काय आहे ?

१९८०

## कवितेचे झुळझुळणारे पाणी

खोल प्राक्तनातून सतत झुळझुळतो
नितळ दुःखाचा प्रवाह
तसे एखाद्या प्रहराआडून पुढे आल्यावर
अचानक दिसते कवितेचे झुळझुळणारे पाणी
निळसर....संथ.
पाऊल भिजताना देहाने नवेपण ल्यावे
असे, की स्वतः स्वतःलाच पारखे व्हावे
आणि तेजोमय शांतीत गळाभर बुडताना
आत्म्याने अविकृत व्हावे....
कोण असतो आपण आणि हे अनादि अविच्छिन्न पाणी?
माझ्या अगदी आतून, मग नसांतून
हे काय ओथंबून आले आहे?
रक्ताच्या अणुरेणूतून हे काय भिरभिरते आहे?

........................

कविता एखाद्या प्रहराआड दिसेनाशी होते
भरतीनंतरच्या रेतीकाठागत सर्वांग होते.
कळ लावणाऱ्या आवेगानंतरच्या पोकळीत मग काय भरते?
काठोकाठ रितेपण—तेही माझेच असते.

हे असे कुठवर चालणार आहे?
ते रितेपण आणि ते ओथंबलेपण
मधल्या ओलसर मातीचे गहनगूढ क्षणन् क्षण
यातूनच का सुजाण होते आहे माझे अश्राप मन?

१९८०

## आता तरी

ज्याचे प्राण भरून स्वागत करावे
असे एकही सुख भेटत नाही.
हा योगायोग म्हणायचा, की प्राक्तन ?
आकांक्षांच्या वांझ सुफलतेचे
चरचरून डाग पडतात आयुष्यावर.
आता किती मिरवायचे मी अशा विजयचिन्हांचे धन ?

मला माहीत नाही, कुठून सुरू होतात
काळजाला कस्तुरी करत जागवणाऱ्या
चैतन्यमय दुःखांचे बहरलेले प्रदेश.
कितीक दिवसांत वाऱ्यावर तिथले गंध नाहीत
आणि भोवती सर्वत्र पेरलेले रक्तहीन स्वप्नांचे संदेश.

ह्या घुसमटत्या निरर्थक तृप्तीतून
कदाचित् जातीलही कविता वर उजवून
नितळ व्यथांच्या आकाशात.
तोवर धीर धरण्यासाठी सोबतीला घेते
ही पोपटाच्या पोटासारखी मने, आणि
शब्द भिरकावते दहा दिशांत.

..........................
आता तरी मातीच्या गर्भाधानाचे सोहळे सुरू व्हावे.

१९८०

## एखाद्या आदिवासी संध्याकाळी

नृत्याचे जन्म व्हावेत अशा आदिवासी संध्याकाळी
कोवळा काळोख घुंगूर बांधून अंतर्बाह्य बहरून आला
पश्चिमेचे अर्पणोत्सुक सिंदूरी रंग नादभिजू झाले.
प्रियकर,
त्याच दिवशी मी रत्नजडित अलंकारासारखे
माझे सावळेपण प्रथमच अंगांगी मिरवले.
दोन शब्दांमधल्या अंधारमऊ वाटेवर
पिसाटासारखे स्वतःला झोकून दिले.

आता झाडांपानांतून पहाट फांकताना
मी काय करावे प्रिया ?
तुझ्याही गाण्यांना हे भोगावे लागले कां रे
एखाद्या अद्‌भुत वेळी ?
की शब्दांची प्रत्येकाशीच असते अशी खेळी,
एखाद्या आदिवासी संध्याकाळी ?

१९८०

## तू – मी

कातळाच्या रासबटपणातून वर झेपावलेले
हे रसरशीत पोपटी गवत–किंचित ओलसर
खोल आत्मविश्वासाने पात्यात घुसलेला
हा आवेगी मस्तीचा वारा–बेदरकार.

अन् त्याच्याही वर, अगदी उंचावरून थोडा कललासा
हा उजट, हसरा, संपूर्ण कृष्णमेघ–तृप्त. निराकार.

............

हे सारे म्हणजे तू .
आणि मी ना ?
असेन ना थोडीशी नंतरच्या रिमझिमीतून
पात्याला बिलगलेल्या थेंबात.

१९८०

## जगण्याला शब्द मिळे

गार निळा घुमट वरी
उगिच जरा ओले जग
करुण मंद ऊन गळे.

चुकुन खडा पडुन कुठे
मंद जळी उठलेले
काहुर हळुहळु निवळे.

सायीपरि संथ हवा
पक्ष्यांचे जागे स्वर
अर्थांचा श्वास जुळे.

पानांतुन प्राणांपरि
इथुन तिथे लकलकत्या
थेंबातिल बिंब हले.

पाउल हलकेच पडे
विजनाच्या वाटेवर
ओळखिचे पान ढळे.

जन्मांचे दुखरेपण
विसरुन हसु झिरपत ये
जगण्याला शब्द मिळे.

१९८०

## पल्याड अपुल्या

किती जवळ हा चमचम तारा तव नजरेचा
किती निखळ हा जवळपणाही गगनधरेचा !

श्वास कसे हे हलके झुळती तव श्वासांवर
नकळत माथां एकपणाचे हलते झुंबर !

किती सुखांचा कंद उमलतो तू असताना
किती व्यथांचा मध झरझरतो तू असताना !

तरी कशी मी व्याकुळ होते, तूही अस्थिर
न कळत असले काय दाटते या भेटींवर ?

आत कुठेशी भयकातर मी, तरिही उत्सुक
नजर तुझीही दोघांमधुनी जाते हरवत.

पल्याड अपुल्या आहे काही खूप पसरले
त्या साऱ्याशी काय असे रे नाते अपुले ?

१९८०

## ओंजळीत तुझे हसू

ओंजळीत तुझे
थेंबभर हसू
गळे देहभास ।

आत काही जागे
तृप्तीलाच लागे
अतृप्तीची आस ।

प्राक्तनाचे रंग
बदलले सौम्य
नितळले ध्यास ।

संभ्रमांना फुटे
सत्याचा मोहोर
कोवळा सुवास ।

ओल्या डोळ्यांतुन
पुन्हा नवे झाले
गेलेले दिवस ।

निर्मितीचे मर्म
स्पर्शिता हळू मी,
सरला प्रवास ।

१९८०

# मर्मबंध

कच्च कालची पालवी
चिंच गाभुळली आज
चंद्र गुंतला फांद्यांत
मला रजताचा साज.

तुला उराशी घेताना
जुने बिल्वर सांडले
नव्या घडणीचे पाणी
रक्तातून निनादले

मर्मबंध निरवले
हसू होऊ नये त्याचे
कालच्याने आजच्याला
हेच पुन्हा सांगायाचे.

१९८०

## कोण्या पुण्यवंत मनी

कोण्या पुण्यवंत मनी
आर्त विश्वाचे दाटले
त्याच्या करुणेचे झरे
भुईपोटी खळाळले ।

माझ्या प्राक्तनाच्या तमीं
झाले व्यथाबीज ओले
एका एका सोसण्यात
रोप रोप फुलों आले ।

काळजातून रंगला
रक्तघावांचा सोहळा
दरक्षणीं पाहुणेरा
नव्या मरणांचा मेळा ।

असे आयुष्यही झाले
दलादलाने सामोरे
यज्ञज्वालेतून यावे
तसे आले सौख्य सारे ।

आता वितीचे हृदय
व्हावे ऋग्वेदाएवढे
सुख पेलण्याला यावे
बळ प्रज्ञेला तेवढे ।

असे ज्ञानाचे आभाळ
माथां अपार झुलावे
माझ्या क्षुद्र अहंतेला
मेघमायेने पुसावे ।

शब्द व्हावा कैवल्याच्या
दिव्य तुळशीचे पान
होवो श्वास सृजनाच्या
साधनेला, समर्पण ।

१९८०

## निंब

दारात निंबाचे रोप लावताना
तिने सायीच्या हातांची प्रणामांजली करून म्हटले :
' मला जे जे वाटतं ते ते सारं या निंबाला मिळावं. '
यावर भगवे हसून, संन्याशाने
तिच्या अजाण शैशवाच्या माथ्यावर हात ठेवला
आणि कावळ्यांचा एक थवा
आकाशातून कलकलाट करीत गेला.

लहानपणचे हे सारे भरून येते
तिच्या तरुण नसांतून अजूनही
एखाद्या सायंकालीन प्रहरापाशी.
निंबाच्या फुलासारखे तिचे नाजुक हात ओंजळ होतात
आणि ती आपला चेहरा लपवते त्यांच्यात.
निंबोणीचा गोड वास तेव्हा सर्वदूर पसरत असला,
तरी तिला माहीत असते—
कावळ्यांची झुंड सांजसकाळ निंबावर झेपावत येते.

१९८०

## चांदण्याच्या कविता

१ नको ना दृष्ट लावूस चांदण्याच्या या सुंदर एकाकीपणाला !
पाण्यात असूनही नसल्यासारखी वाटणारी त्याची झळाळी
स्वतःचं वेगळेपण तसंच जपते.
जसं तुझं-माझं नुकतंच झालेलं बोलणं;
आणि बघ पानांमधून टपटपते त्याची पागोळी
तेव्हाही तिची ओल जाणवते तरी रहात नसते इथे तिथे,
जणू तुझं सायंकाळचं कविता म्हणणं....
आपल्यातून निसटलेल्या ऐश्वर्यवान स्वप्नासारखं
हे श्रीमंत एकटेपण
चांदण्याशिवाय आणखी कुणाच्या ओंजळीत असणार आहे ?
करुणेची ही चमचमती किनार आणखी कुणाच्या
पोकळीत झुलणार आहे ?
म्हणून म्हणते, नको दृष्ट लावूस
चांदण्याच्या या सुंदर एकाकी क्षणाला !

२ काय तुला देऊ ? चांदण्याची गाणी ?
भलतेच काही मागू नको राणी ?
मेघांच्या व्यथांची काल झाली न्हाणी
सांकळे गाण्यात करुणेचे पाणी !

३ शहरावर सर्वत्र पसरणाऱ्या
चांदण्याच्या या मऊशार झिरमिराटात
उत्सवांचे जथे बेहोष फिरत आहेत.

राणी, उद्यापासून कणाकणानं वाढणाऱ्या
अंधाराची त्यांना जाणीव नाही ?
की ते शोषून घेताहेत चांदणंच
पुढच्या पौर्णिमेपर्यंतचा अंधार उजळण्यासाठी ?

असल्या उत्सवी गाण्यांची आपल्याला गरज नाही राणी !
तुझ्यामाझ्यातल्या चांदण्याइतकाच
आपल्यामधला अंधारही मला हवा आहे.

सत्याला सामोरं जाणं तुला तितकंच
सोपं नाही ना वाटत, जितकं
चांदण्यात शहरभर हे उत्सवांचं भिरभिरणं ?

४ चांदण्यात बेहोषी असते ?
मला माहीत नाही असलं काही !
असतीलही त्याची अनंत रूपचित्रं
जशी माझ्या पलंगावर येणाऱ्या प्रत्येकाची.
पण मला जसा माहीत असतो त्यांचा एकच चेहरा
—अगतिक, भुकेल्या हिंस्रतेचा,
तसा या चांदण्याचाही माहीत आहे एकच चेहरा
—निरर्थक दुखऱ्या, मचूळ ग्लानीचा.
एवढं मात्र खरं की, मलाही आवडते
तुमच्यासारखीच ही पौर्णिमा.

.... .... ....

चांदण्याच्या ग्लानीला किती अफाट भरती येते....
( आधीच्या पाशवी उन्मादालाही तेवढी नसते. )

५ रडत रडत दिवस गेला
प्रहराचं कुरकुरणं आणि हट्टी बाळपण
हवेत भरलेलं अशक्त म्हातारं आजारपण
श्वासात साठलेलं घुसमटतं दबलेपण
फाटक्या भिंतींतून ओघळणारं घरपण........
रात्र यायची तशीच आली :

‘ थकले रे मी. नाहीच त्राण आता
स्वप्नांना पापणीत बोलावण्याचं.
हे ना ? भेगांना मलम लावते जरा.
गजर लाव हं, उद्या आणखी लवकर उठायचं. ’

‘ नुसती इकडे ये सई !
वर कौलाच्या भोकातून बघ चंद्र दिसतो आहे.
आज पौर्णिमा तर नाही ?
गुलाम बघ कसा वाटोळा. अन् हसतो आहे.

.... .... ....

सई, शहाणी ना तू ? डोळे का ओले ?
अगं, आपल्यासाठीच हे भोक मोठं झालं आहे.
अन् नसू दे इतर काही.
भोकातून आत येणारं हे चांदणं तर आपलं आहे ! ’

६ दूर कुठे तरी ढोल वाजत होते ?
आठवत नाही
तुझ्या तर कानांशी चांदणं रुजत होतं.

पानांवर फुलांचे ओठ टेकले होते ?
पाहिले नाही.
तुझ्या तर डोळ्यांत चांदणं झुकत होतं.

वृक्षांच्या मुळांशी पाणी हलत होतं ?
ठाऊक नाही.
तुझ्या तर स्पर्शातून चांदणं झरत होतं.

पौर्णिमेशपथ सांग.
हे सगळं तुलाही माहीत नाही; तू उगाच म्हणतेस.
होय ना ?
काल फक्त चांदणं होतं, एवढंच आपल्याला माहीत आहे–
लाजतेस का ? खरं ना ?

७ मंद सोशिक चांदणे जरा नभात सांडले
गर्द अंधाराने तेव्हा खेळ दुःखात मांडले।

लख्ख बिलोरी चांदणे जरा पाण्यात हासले
लक्ष प्राक्तनांचे जग एका गाण्यात नाचले।

गुच्छागुच्छांनी चांदणे जरा रानात फाकले
धुंद अप्सरांनी देह गच्च पानांत झाकले।

ब्रह्मचैतन्यचांदणे जरा ध्यानात जागले
आणि कृतार्थता त्याले जन्म प्राणांत मागले।

१९८०

## तिच्या कविता : भांडणानंतरची स्वगते

१ अशी किती वेळा पत्रांना निःसंग उत्तरं लिहायची
अन् स. न. वि. वि. लिहिताना दात घट्ट रोवायचे ओठावर ?
तुलाही कधीपासून सवय लागली,
शब्दांना परकेपणाचा लळा लागल्यावर हसण्याची.
मी प्रयत्न करते, मनातला अनावर समुद्र उसळल्यावर
अपुऱ्या हातांनी थोपवण्याचा
अन् तोही परत फिरतो सारं समजल्यागत
मागे पावलांची खूणही राहू न देता.
आणि इकडे शब्दांच्या रोखलेल्या नजराही
असं शरमिंदं करतात की....
आता मला तुझ्यापर्यंत नेण्यासाठी
मी कोणत्या नावेची सोबत घ्यावी ?

२ मी हे असंच बोलत राहिले
पानांच्या कुशीत निवांत पहुडलेल्या वाऱ्याबद्दल,
कुरणावर विखुरलेल्या गवतफुलांबद्दल,
'सावित्री'बद्दल आणि 'मानसी'बद्दलही.
खरं म्हणजे यातलं काहीच मला बोलायचं नव्हतं.
मला सांगायच्या होत्या दोनच गोष्टी–

एक : गेल्या जानेवारीतल्या संध्याकाळी
बगळ्यांच्या रांगा घरी परतताना
सूर्य गडद केशरी होत जायचा.

दोन : हल्ली झाडांची पाने गळतात
तेव्हा बगळे संथ उडत निघालेले असतात
एकदाही मागे वळून न पहाता.

पण ह्यांतलं काही सुद्धा मी बोलले नाही.
नुस्ता थरथरला माझा हात
तुझ्या केसांत अडकलेलं वाळकं पान उडवताना,
अन् तू अशी आभाळ भरून हाक दिलीस !
खरं तर तुला हेही सांगायचं होतं की,
हल्ली माझा आवाज मलाच अनोळखी झाला आहे,
मी ओ दिलेली तुला कळेल ना ?

२ समज, माझ्या डोळ्यांत याचनांचे मेघ
नव्या नितळ दुःखाने ओथंबून आले
अन् तुझ्या क्षमेचे अंकुर सरसरून वर आले,
तरी पुन्हा एकदा वनमहोत्सव सुरू होणार आहे का ?
मला माहीत आहे, तू समजशील,
ते रान म्हणजे तुझ्या क्षमाशील रक्ताची किमया
अन् कदाचित् मीही समजेन
ती माझ्याच समंजस याचनांची माया.
तसं झालं तर मात्र माझे डोळे पुन्हा पावसाळा भोगणार नाहीत,
तुझी जमीनही हिरवेपण विसरून जाईल.
म्हणून म्हणते आत्ताच ठरवू या
पाण्याच्या नि जमिनीच्या नात्याचे नेमके अर्थ.

१९७९

## अंतातुन प्रारंभ नवा

तुटण्यासाठी पुन्हा जुळावे,
पुन्हा नवी ही जिद्द कुठून ?
फुटुन वाहण्यासाठी येती
उरात जखमा कशा भरून ?

पराभवातिल गंध कुठुन हा
मुक्या जिवाला करि बेभान ?
कुठून तप हे, मिळण्यासाठी
दुःखैश्वर्याचे वरदान ?

शब्दार्थावर कसे उमटती
व्याकुळणारे हर्षठसे ?
अंतातुन प्रारंभ नवा, हे
जगणे मरणे रोज कसे ?

१९८०

## माझीच मला ही कविता

भर्जरी उन्हाच्या प्रहरी
कधि स्वतःत भिजली माती
आकाश हवे
निर्मिले नवे
नवतेची कोमल नाती.

पाऊसउण्या प्रहरांशी
कसलाही दावा नव्हता
आपुले कळे
अपुल्याच बळे
विश्वंभर हृदयी हसता.

बीजांचे अक्षर जगणे
ही मनोज्ञ कुठली ममता ?
मातीहि नव्हे
आकाश नव्हे
माझीच मला ही कविता.

१९८०

REFBK-0025337
REFBK-0025337

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५८
दा. क्र. २५३३५
काव्य २/५/८८
ठाणे शाखा (स्थळ प्रत)